International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.4 Mar – Apr 2023

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजीक चळवळ

**प्रा. प्रमोद चंद्रभान वानखेडे**
रा.सुं बिडकर कला, वाणिज्याव विज्ञान महाविद्यालय, हिंगणघाट जि वर्धा
*Corresponding Author* - प्रा. प्रमोद चंद्रभान वानखेडे
E-mail – pramodwankhede38@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7919366

डॉ. आंबेडकरांनी जीवनाच्या अंतापर्यंत विविध पातळयावर समाजातील सर्वच लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांचे हित जोपासण्यासाठी सतत प्रयत्न केले त्यासाठी यांनी विविध साहित्य निवेदने, चर्चा, परिसंवाद यासर्व बांबीचा आधार घेतला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र, समता, बंधता व न्याय यावर आधारित लोकशाही या देशाला दिली देशाचे आर्थिक नियांजन कसे असावे यासंदर्भात वेळोवेळी विचार दिले कोणत्याही समस्येचा विचार म्हणजे समान्या जनतेचे गरीबांचे हित त्यांच्या केंद्रस्थानी होते. भारत देश गरीब होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे धार्मीक कायदे व त्यातुन निमर्ण झलेली जातीयता होय. सामाजीक व्यवस्था बदलायची असल्यास राजकीय व्यवस्था बदलने आवश्यक आहे. थोडक्यात राजकीय लोकशाही ही समाजीक लोकशाही परिवर्तीत करतांना ती यशस्वी होईलच याची शाश्वती नसते.

15 ऑगष्टा 1947 ला भारत देश इंग्रजानी 150 वर्षे राज्या केल्यानंतर स्वतंत्र झाला. व आपण 26 जानेवारी 1950 ला डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी अथक परिश्रम करुन घटना लिहीली ती स्विकारुण आपण प्रजासत्ताक झालो. आपणासर्वाना समान मतदानाचा अधिकार मिळाल्यामुळे आपण आपले लोकांसाठी व लोककल्याणासाठी सरकार स्थापन करण्यास सक्षम झालो. डॉ. आंबेडकरांना अक्षेक्षित असलेली लोकशाही देशातील शेवटच्या नागरीकांपर्यंत पोहचवीणे आवश्यक आहे. डॉ आंबेडकरांना कामागार वर्गाची व सामाजीक लोकशाही अपेक्षित होती. डॉ. आंबेडकरांनी जे जे लढे, ओदालन, चळवळ उभारल्या त्या कोणत्याही व्यक्तीगत हितसंबंध जोपासण्यासाठीनव्हत्या तर सामाजीक व समुदायीक हित साधणा-या होत्या. चवदार तळयातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नापासून सुरु केलेली मानवी हक्काची चळवळ आम्ही कोण आहोत या प्रश्नाची विचारणा करुन आत्मासन्मानाची केलेली चळवळ, राज्य समाजवादाची संकल्पणा मांडून आर्थिक समानतेची मागणी, जाती व्यवस्थेला खतपाणी घालुन व्यक्तीचे शोषण करणा-या जाती व्यवस्थेला पोसणा-या धर्माशी फारकत घेवून प्रस्थापीत धर्माच्या विरुध्दा उभे राहुन धर्मातराची चळवळ किंवा या देशाची राज्याघटना समता स्वातंत्र व बंधुता यातत्वावर उभी आहे.

महाड नगर पालीकेने जरी सहकारी अखत्यारितील सर्व पानवठे अस्पृश्यांना खुले केले असले तरीही त्या पानवठयांवर तसा कोणताही उल्लेख केला नव्हता. त्यामुळे ऐवढया मोठया संखेने अस्पृश्य जमा होवुनही त्यांना आसपासच्या कोणत्याही पाणवठयांवरुन पिण्यासाठी पाणी घेण्याची हिम्मता केली नाही. आणि म्हणुन हया सभेसाठी आलेल्या लोकांच्या पाण्याच्या योयीसाठी 40 रु. किमंतीचे पाणी विकत घ्यावे लागले चवदार तळयाचे पाणी पिहुन डॉ आंबेडकर सभेकरीता राहत असलेल्या सरकारी बंगल्यावर परतले व इतर सर्व लोक सभेच्या मंडपात गेले तेवढयात धर्म धाक्यात आल्याचे महाड गावातील सर्वर्ण लोकांनी बातमी पसरविली आणि आता हे सर्व लोक विश्वराच्या मंदीरात प्रवेष करणार आहोत. त्यातुन उच्च जातीय हिंदु" एक घोळका लाठया काठया व हत्यारे घेवून सभेच्या ठिकाणी आला व सत्याग्रही लोकांवर हल्ला चढविला.

20 मार्च 1967 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रायगड जिल्हात महाड येथील चवदार तळयावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून केलेला सत्याग्रह घेता. त्याला महाडाचा सत्याग्रह चवदार तळयाचा सत्याग्रह किंवा महाडाचा मुक्तीसंग्राम म्हणून ओळखले जाते. आणि म्हणून 20 मार्च हा दिवस समाजीक सबलीकरण दिन म्हणून भारतात साजरा केला जातो ही आंबेडकारांच्या नेतृत्वाखाली लोकांनी मोठया संखेने एकत्र येवून केलेली पहीली चळवळ होय.

भारतीय जाती व्यवस्थेमुळे अस्पृष्या लोकांना उच्चा जातीतील हिंदुपासून वेगळे ठेवण्यात आले होते. या लोकांना पाण्याच्या मुख्या स्मोतापासून पाणी घेण्यास तसेच मुख्या

रस्त्यांवरुन चालण्यास परवानगी नव्हती ऑगस्टा 1923 मध्ये मुंबई कायदे मंडळाचे एक निर्णय पारीत केला त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या व सुसिथतीत ठेवलेल्या सर्व मानमत्तेवर सर्वाना म्हणजेच अस्पृश्यांनाही वहीवाहीचा हक्का असेल असा महाडाच्या नगर पालीकेने जानेवारी 1924 मध्ये हया कायदयाची अंमलबजावणी करणारा निर्णय पारीत केला.

यासाठी स्त्रियांचा सहभाग लक्षणिय मानाला जातो. स्त्रियांनी आपली जात दाखविणारी कोणतीही लक्षणे आपल्या शरीरावरुन बाळगण्यापिषयीचे आव्हान केले दलित व स्त्री म्हाणून होणा-या दुहेरी शोषणांचा आच दलित महिलांना होता बाबासाहेबांच्या एकुण चळविळीतील सर्व महत्वाच्या टप्प्यांवर महिलांनीही मोठया प्रमाणावर प्रतिसाद दिला. प्रत्योक लढयामध्ये पुरुषांइतकीच स्त्रियांची संख्या होती परंतु त्याची नोंद इतिहासात दिसत नाही डॉ आंबेडकरांनी सामाजीक न्याय व समानता यासाठी व्यवस्थेच्या विरोधात जे लढे दिले त्या सर्वामध्ये स्त्रियांचा सक्रिय सहभाग होता. पुरुषसत्ता व जाती व्यवस्था या दोन्ही मिळूनन निर्माण होणा-या शोषणाचा प्रश्ना हिंदु कोड बिलाच्या माध्यमातून देशाच्या राजकारणाच्या अग्रभागी आणला त्यांची विवाह घटस्फोट, वारसा, मालमत्ता, दत्तक या संदर्भातील जातीनिहाय कायदयांना ठाम नकार दिला होता यासाठी स्वत: स्त्रियांना शिकुन जागृत झाले पाहीजे त्याच धारणेतून ते दलित स्त्रियांना सांगत असत बाबासाहेबांच्या एकुण चळवळीतील सर्व महत्वाच्या टप्प्यांवर महिलांनी भरभरुन प्रतिसाद दिला. काळाराम मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहात 1930-35 या काळात दरवर्षी महीला आपली छोटी मुले खांदयावर घेवून चालत येत असात डॉ. आंबेडकरांच्या महापरीनिर्वानंतर दलित चळवळ काही प्रमाणात कमकुवत झाली. साधारणता दलित पॅथरचा उदय साठ-सत्तरच्या दशकाच्या झपाटयाने बदलत असलेल्या समाजिक, राजकीय, सास्कृतिक पर्यावरणातून झाला या चळवळीत महिलांचा मोठया प्रमाणावर सहभाग होता. यामागील कारण म्हाणजे महिलांवर होणारे अत्याचार होय या चळवळीमुळे महिलांना मोठया प्रमाणावर संरक्षण बहाल करण्यात आले.

बाबासाहेबंनी सामाजीक अन्यायापाून ते कामगार-शेतकरी, कष्टाक-या साठी अखेरपर्यत प्रयत्ना केले. बहिस्कृत भारत, जनता, प्रबुध्द भारत या नियत कालींकाच्या माधमातून सामाजीक राजकीय अप्रवृत्तीवद ताशेरे ओढले व प्रबोधनाचे काम केले देशाच्या राजकारणात सात्क हस्तक्षेप करुन दलित समुहांची ओळख स्वत्रंपणे करुन दिली. डॉ आंबेडकरांनी सत्तेसाठी मंत्रीपदाशी तडजोड केली नाही तत्कालीन सरकाने डॉ आंबेडकरांनी मांडलेले हिंदु कोड बिल मंजुर करण्यास नकार दिला तेवहा त्यांनी महीलांच्या समातेच्या हक्कासाठी राजीनामा दिला.

**भारतीय सविधानातील उदात्ता जीवनमुल्ये –**

घटना ही राज्याचे स्वातंत्र अंबाधित ठेवून त्या राज्याच्या घटकांना व देशातील लोकांना स्वातंत्र देत असत व्यक्तीच्या स्वातंत्रामुळे राज्याच धोक्यत येत असेल तर स्वातंत्राला मुरड घाणे आवश्याक असते. आर्थीक स्थर्यि नसलेली घटना केव्हाही कोलमडून पडू शकते. समाजात भेदभेद असेल तर त्याच्यामध्ये एकता निमार्ण होत नाही. समाजीक समता एक महत्वाची मानली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकारामुळे आप आपल्या राहणीमानात, विचारातच नव्हे तर संपूर्ण जीवनामध्ये अमुलाग्र बदल झाला. डॉ आंबेडकार ज्या ध्येय धोरणासाठी आपले संपूर्ण आयुष्य दिले आपल्या कुटुंबाचा विचार केला नाही डॉ आंबेडकारांची चळवळ, शिकवण आचाराणात आपण्यासाठी प्रथम एकसंघ होणे आवश्याक आहे. घटना ही राज्याचे स्वातंत्र अबाधित ठेवून देशातील लोकांना स्वातंत्र देत असते व्यक्तीच्या स्वातंत्रामुळे राज्या धोक्यात येत असले तर त्या स्वातंत्राला मुरड घालणे आश्यक असते समाज भेदाभेदात पोखरला असल्यास त्यामुध्ये समानता निमर्णण होत नाही डॉ आंबेडकरांच्या संपूर्ण चळवळीत व लिखानात एकच ध्यास होता तो म्हणजे जातीविरहीत व वर्णविरहीत समाज निमार्ण करण्याचा व त्यासाठी त्यांनी आपल्या संपुर्ण आयुष्याचे बलिदान दिले डॉ आंबेडकरोचे या देशावर फार मोठे उपकार आहेत ते वेवळ एका समाजाचे नेते नसून संपूर्ण समाजाचे आधार स्तंभ होत. डॉ आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून जी जीवनमुल्ये दिली त्याची जोपासणा देशातील प्रत्येक नागरीकानी करणे आवश्यक आहे.

**राजकीय व्यवस्था**

सामाजीक व्यवस्था बदलायची असेल तर प्रथम राजकीय व्यवस्था बदलाची लागेल यासाठी राजकीय व्यवस्थेला सामाजीक व्यवस्थेत परिवर्तीत करणे आवश्यक आहे भारतात सामाजीक विषमतेतूनच आर्थीक विपमता निर्माण केली आहे संपत्ती गोळा करण्याचे सर्वाना स्वातंत्र असेल प्रत्यक व्यक्तीला जीवन जगण्यासाठी सोयी सवलती मिळणे आवश्यक आहे.

भारतात अस्पृश्या, भटका वर्ग आहे तोच श्रमीक आहे परंतु तो निर्थन आहे या काळात शिक्षणाचे अधिकार कोणालाही नव्हते. शिक्षणाच्या अभावामुळे विषमता निर्माण झाली. डॉ आंबेडकरांच्या मते. आर्थीक विषमता नष्टा कारायची असेल तर राजकीय लोकाशाही सुदृढ करुन चालणार नाही तर आर्थीक समाजीक लोकशाही सुध्दा मजबुत करावी लागेल त्यासाठी स्वातंत्र, समता व बंधुता महत्वाची आहे बंधुतेशिवाय समता प्रसथापीत होणार नाही. ब्रिटीश भारतातुन गेल्यास समाजाचे शोषण बंद होईल

कारण इंग्रज भारतातुन कच्चा माल घेवून जायचे व पक्का मालाची किमंत मोठया प्रमाणावर आकारत होते डॉ आंबेडकरांच्या मते ब्रिटीश गेल्यामुळे समानता निर्माण होणार नाही तर त्यासाठी सामाजीक व्यवस्था बदलणे गरजेचे आहे. आणि म्हणुन डॉ आंबेडकरांना क्रांतीकारक मानले जाते सर्वप्रथम सामाजीक व आर्थीक दरी मिटविणे आवश्याक आहे तसेच प्रत्येक व्यक्ती कायदयासमोर समान असला पाहीजे.

आज मात्र वर्णव्यवस्थेमुळे धार्मीकतेमुळे, जातीमुळे आर्थीक विषमता जोपासतांना दिसून येते डॉ आंबेडकरांनी संविधानिक मार्गाने सामाजीक व आर्थीक हित जोपासण्याचा प्रयत्न केला परंतू या देशातील प्रचलीत व्यवस्थेने समाजीक हितापेक्षा स्वाहिताला विशेष महत्वा दिले.

**समान संधी-**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ आंबेडकरांनी विश्वारत्ना म्हणून आपण संबोधायला लागलो, तळागाळातील वर्णव्यवस्थेच्या चक्रातअडकलेल्या वंचित शोशित, बहुजनांना सन्मानाने जगण्याचा अणिकार बाबासाहेबानी दिला चातुवर्ण व्यवस्थेला भेदून न्याय, समता, बंधुंता व स्वातंत्र यावर आधारीत व्यवस्था निर्माण केली डॉ आंबेडकर हे पराकोटीचे राष्टनिष्ठा असलेले व्यक्तीमत्वा होते ते म्हणतात मी प्रथम भारतीय आहे व नंतर भारतीय आहे तसेच 13 ऑक्टो. 1935 मध्ये नासिक जिल्हायातील येवले येथे केलेली घोशणा मी हिन्दु म्हणून जन्मलो तरी, हिंदु म्हणून मरणार नाही. 14 ऑक्टो. 1956 ला लाखो अनुयायासह हिंदु धर्माचा त्याग केला. डॉ आंबेडकरा व्यतिरीक्त तळागळातील लोकांचा विचार कोणही केला नाही, बहंजनांच्या सुख समुध्दीचे स्वप्न पाहून जगणारी डॉ आंबेडकर एकमेव व्यक्तीत्वा आहे. शोशीत पिढीत तळागळातील लोकांना बुरसटलेल्या विचारसरणीतून बाहेर काढुन समतेचा, बंधुत्वाचा, आणि न्यायाचा विचार देवून समपातळीवर आणण्यासाठी पयत्न केले व्यवस्थेत जखळलेल्या मानसाच्या पापात समर्थपणे उभे राहण्याचे बळ निर्माण केले भविष्यात या लोकांचे शोशण होवू नये यासाठी डॉ आंबेडकारंनी घटनेच्या तिस-या भागातील कलम क्र. 42 मधुन स्वातंत्रचा अधिकार बहाल केला.

स्त्रियांचे अधिकार नाकारणा-या व जगण्याचे सर्वच मार्ग बंद करणा-या मनुस्मृतीचे दहन केले आणि स्त्रीमुक्तीसाठी त्यांनी लढा उभारला होता डॉ. आंबेडकराच्या या लढयामुळे सर्व समान्याना त्याचे माणूस म्हाणुन जगण्याचे अधिकार घटनेतून मिळाले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने व आचाराने या देषातील सर्वच शोषित. पिडीतांना राष्टीय प्रवाहात आणण्याच काम कल आहे. यथात पाणूस शोशणमुक्त असेल तर राष्टाचे आरोग्या सुदृढ राहील असे त्यांना वाटत होते समता, स्वातंत्र, बंधुता व न्याय या मानवी मुल्यामुळे मानव जीवन उन्नतीकडे वाटचाल करेल असे त्यांना वाटत होतो अशा पध्दतीने या विविध धर्मा देशात मुलागामी पातळीवरुन आधुनिक राष्टाचा विचार डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यतीरीक्त कोणीही केल्याचे दिसत नाही. मानसा बरोबरच त्याची प्रतिष्ठा देखील महत्वाची आहे त्याच बरोबर देशाची पतिष्ठा देखील महत्वाची मानली

**संदर्भ सुची –**


1) महाडचा मुक्तीसंग्राम व नानासाहेब टिपनीस - प्रा. झुंबरलाल कांबळे सुगावा प्रकाशन

2) लोकसत्ता दैनिक वर्तमान पत्र

3) महाराष्टा टाईम्स

4) महानायक – दैनिक वर्तमान पत्र

5) कामगार कायदे ॲन्ड अभय शेलकर – प्रकाशन नासिक लॉ हाउस

6) अनंत पैलूचा सामाजीक योध्दा – दलितेतरांसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखक प्रल्हाद लुलेकर प्रकाशन सायन पब्लिकेशन प्रा ली पुणे

7) अनुयायी लेखक तु.ली. कांबळे – शिल्पा प्रकाशन नागपुर

8) असे घडले ज्ञानसुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर – लेखक व.न. इंगळे सांकेत प्रकाशन औरंगाबाद

9) आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना – लेखक रावसाहेब कसबे संगावा प्रकाशन पुणे

10) आंबेडकर यांचे राजकीय विचार – भ. द. देशपांडे लोकवाडमय गृह प्रकाशन मुंबई